# दै.लोकवतन

जनसामान्यांचा विश्वास,सत्याचा आवाज

दि.१६-०१-२०२६, वार:शुक्रवार | मुख्य संपादक:साहिल रामटेके


# 31 डिसेंबरपूर्वीच 100% कर वसुली:कोकणा बनले आदर्श गाव

**पंकज परशुरामकर** | दै.लोकवतन:अर्जुनी/मोर



समृद्ध पंचायतराज योजनेत कोकणाचा डंका-शंभर टक्के वसुलीचा विक्रम

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत कोकणा ग्रामपंचायतीने घरकर व पाणीकर वसुलीचे उद्दिष्ट ३१ डिसेंबर २०२५ पूर्वीच शंभर टक्के पूर्ण करून जिल्ह्यात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. ग्रामपंचायतीकडील एकूण६५७ खातेदारांकडून ७ लाख ३६ हजार ५८५ रुपयांची कर मागणी होती. मागील वर्षीही शंभर टक्के वसुली झाल्याने यावर्षी केवळ चालू वर्षाचीच मागणी होती, तरीदेखील नियोजनबद्ध व लोकसहभागातून उद्दिष्ट वेळेआधीच पूर्ण करण्यात आले.अभियानात सहभाग घेतल्यानंतर ग्रामपंचायतीने योजनेचे महत्त्व ग्रामस्थांना समजावून सांगितले. “आपले गाव शंभर टक्के सहभाग असलेले आदर्श गाव व्हावे” या भावनेतून ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्कॅनरद्वारे तसेच काही प्रमाणात रोख स्वरूपात कर भरून मोलाचे सहकार्य केले.कोकणा ग्रामपंचायतीपासूनच संपूर्ण जिल्ह्यात या अभियानाची सुरुवात झाल्याने नागरिकांचा उत्साह वाढला. लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग लाभला. वसुली शंभर टक्के करण्यासाठी महावितरणचे श्री. रेवतकर यांचे विशेष सहकार्य आणि मार्गदर्शन लाभल्याचे ग्रामपंचायतीकडून सांगण्यात आले.या यशस्वी कामगिरीसाठी आमदार इंजि. राजकुमार बडोले, जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. लायकरामजी भेंडारकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. एम. मुरुगनाथम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मधुकर वासनिक, तालुक्याचे पालक तांत्रिक अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विजय लोढे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जनरल) श्री. फनेंद्र कुत्रीकर, पंचायत समिती सभापती श्री. चेतनजी वाडगाये, पंचायत समिती सदस्य कु. कविता ताई रंगारी, उपसभापती सौ. निशाताई काशीवार, जिल्हा परिषद सदस्य, गट विकास अधिकारी श्री. आदित्य ठाकरे, सहायक गट विकास अधिकारी श्री. डी. एम. खोटेले, पंचायत समिती सदस्य श्री. शिवाजीभाऊ गहाने, विस्तार अधिकारी पंचायत श्री. वाय. सी. पटले, श्री. सी. आर. शहारे यांचे मार्गदर्शन लाभले.यासोबतच सरकारी स्वस्त धान्य दुकानदार तथा माजी उपसरपंच श्री. खेमराजजी भेंडारकर, विविध कार्यकारी सहकारी सोसायटी कनेरीचे उपाध्यक्ष श्री. ईश्वरजी कोरे, ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी, महिला बचत गट, तसेच आधुनिक स्कॅनर तंत्रज्ञानाचा वापर यामुळे हे उद्दिष्ट शक्य झाले.या उल्लेखनीय यशाबद्दल सरपंच सौ. अमरदीप रोकडे आणि ग्रामपंचायत अधिकारी श्री. धर्मराज लंजे यांनी अभियानात सहकार्य केलेल्या सर्व ग्रामस्थांचे, लोकप्रतिनिधींचे व प्रशासनातील अधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.